# उपसंचालक आरोग्य सेवा, नाशिक मंडळ, नाशिक

समुदाय आरोग्य अधिकारी यांचे प्रवेश परीक्षा दि.२२/०१/२०२३

## सुचना

१) समुदाय आरोग्य अधिकारी या पदासाठी **BAMS/BUMS/B.Sc Nursing/PB B.Sc Nursing** ही शैक्षणिक अर्हता असलेल्या पात्र उमेदवारांची प्रवेशपरीक्षा वरिष्ठ कार्यालयाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार तसेच यापुर्वी या कार्यालयाने प्रसिध्द केलेल्या सुचनांच्या अधिन राहुन दि.२२/०१/२०२३ रोजी सकाळी ११:०० ते दुपारी ०१:०० वाजेपर्यंत आयोजित करण्यात आलेली आहे.

### -: प्रवेश परीक्षेचे ठिकाण :-

क्रांतीवीर व्ही.एन. नाईक शिक्षण प्रसारक संस्था, डोंगरे वस्तीगृह परिसर, कॅनडा कॉर्नर, नाशिक ४२२००२

उपरोक्त प्रवेश परीक्षेच्या ठिकाणी महाविद्यालयाच्या अधिनस्त असलेल्या खालील इमारतींमध्ये जिल्हानिहाय प्रवेश परीक्षा आयोजित केलेली आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नांव | परीक्षा केंद्राचे नांव |
|---|---|---|
| १ | अहमदनगर व नंदुरबार | अभियांत्रिकी महाविद्यालय, |
| २ | धुळे व जळगाव | फार्मसी महाविद्यालय, |
| ३ | नाशिक | कला वाणिज्य व विज्ञान विद्यालय, |

२) तसेच ज्या उमेदवारांना कार्यालयात हजर राहुन प्रवेशपत्र घेण्यासाठी शक्य होत नाही अशा उमेदवारांना दि.२२/०१/२०२३ रोजी परीक्षा केंद्रावरच प्रवेशपत्र देण्याची सुविधा सकाळी ०९:०० ते सकाळी १०:०० वाजेपर्यंत उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी सदरचे प्रवेशपत्र मिळविण्यासाठी आधार कार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट, पॅनकार्ड किवा वाहन चालविण्याचा परवाना यापैकी किमान एक ओळखीच्या पुराव्याद्वारे ओळख पटवुन प्रवेशपत्र उमेदवारांनी प्राप्त करुन घ्यावे. तसेच सदर ओळखपत्राची स्वयंम सांक्षांकित छायांकित प्रत तसेच सोबत प्रवेशपत्रावर चिटकविण्यासाठी स्वत:चा पासपोर्ट साईजचा फोटो व डिंक सोबत आणणे.

३) एकाच उमेदवाराने राखीव व अराखीव अशा दोन प्रवर्गातुन अर्ज केलेला असल्यास उमेदवार ज्या प्रवर्गासाठी परिक्षा देईल तोच प्रवर्ग उमेदवारासाठी ग्राहय धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४) उमेदवारांनी परीक्षेच्या नियोजित वेळेपूर्वी ३० मिनिटे अगोदर परीक्षा केंद्रावर हजर रहावे. उमेदवाराने परीक्षेकरीता काळया शाईचे बॉल पेन वापरावे. परीक्षेसंबंधित इतर सुचना प्रवेशपत्रामध्ये नमुद करण्यात आलेल्या आहेत. तसेच परीक्षेनंतर प्रवेशपत्र जमा करुन घेतले जाणार याची नोंद घ्यावी.

५) सदर भरतीप्रकियेदरम्यान कोणतीही पूर्वसूचना न देता उमेदवारांना पात्र/अपात्र ठरविणे परिक्षेची दिनांक, स्थळ बदल करणे, परिक्षा रद्द करणे व परिक्षा दरम्यान उद्भवणाऱ्या सर्व अडचणीचे निरसन करणे याबाबतचे सर्व अधिकार उपसंचालकांनी राखून ठेवले आहेत.

/-स्वाक्षरी
(डॉ.कपिल प्र. आहेर)
उपसंचालक, आरोग्य सेवा
नाशिक मंडळ, नाशिक